8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## डॉक्टरांनी भयमुक्त वातावरणात सेवा द्यावी; पोलीस संरक्षण देणार

### जालना IMAच्या निवेदनाची पोलीस अधीक्षकांकडून दखल; धमक्या, खंडणी, ब्लॅकमेलिंग व सोशल मीडियावरील बदनामी विरोधात कठोर कारवाईचे संकेत

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील खाजगी रुग्णालये, डॉक्टर, वैद्यकीय व्यावसायिक आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. डॉक्टरांना धमकावणे, खंडणीसाठी दबाव आणणे, उपचारांचे बिल न भरता रुग्णालयातील कर्मचारी व डॉक्टरांशी दमदाटी करणे, तसेच सोशल मीडियावर कोणतीही पूर्वतपासणी न करता डॉक्टरांची एकतर्फी बदनामी करण्याच्या प्रकारांबाबत इंडियन मेडिकल असोसिएशन (), जालना शाखेने पोलीस प्रशासनाकडे गंभीर तक्रार मांडली आहे.



सोमवारी, ५ ऑक्टोबर रोजी जालना शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत लेखी निवेदन सादर केले. या निवेदनाची पोलीस प्रशासनाने दखल घेतली असून, जालना शहरातील सर्व खाजगी रुग्णालयांना आवश्यक ते संरक्षण देण्याची भूमिका पोलिसांनी स्पष्ट केली आहे. डॉक्टरांनी कोणत्याही प्रकारच्या भीतीच्या वातावरणात काम करण्याची गरज नसून, भयमुक्त वातावरणात रुग्णसेवा द्यावी, असेही पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

ने पोलीस प्रशासनाकडे सादर केलेल्या निवेदनात खाजगी रुग्णालये आणि डॉक्टरांना लक्ष्य करून धमकावणे, ब्लॅकमेलिंग तसेच खंडणीसाठी दबाव आणण्याचे प्रकार होत असल्याचा मुद्दा मांडला आहे.

रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांना विविध कारणांवरून धमकावणे अथवा दबाव आणणे यामुळे वैद्यकीय क्षेत्रात असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होऊ शकते. अशा प्रकारांमुळे डॉक्टरांना मुक्तपणे आणि निर्भयपणे वैद्यकीय सेवा देताना अडचणी निर्माण होत असल्याचे ने निवेदनातून निदर्शनास आणून दिले आहे.

या पार्श्वभूमीवर अशा प्रकारे धमकी किंवा खंडणी मागितली जात असल्यास संबंधितांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी डॉक्टरांच्या संघटनेने केली.

रुग्णालयात उपचार पूर्ण झाल्यानंतर देय असलेले बिल न भरता डॉक्टर किंवा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांवर दबाव आणणे, दमदाटी करणे अथवा वाद निर्माण करण्याचे प्रकारही होत असल्याचा मुद्दा ने मांडला आहे.

उपचारासाठी झालेल्या योग्य देयकाच्या वसुलीसाठी रुग्णालयीन कर्मचाऱ्यांनी पाठपुरावा केल्यानंतर त्यांनाच धमकावले जात असल्यास त्याची पोलीस प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी, अशी भूमिका मांडण्यात आली. अशा (पान २ वर)

## दोन महामार्गावरील अतिक्रमणांवर प्रशासनाचा बुलडोझर

### जालना - वाटूरसह छत्रपती संभाजीनगर - जालना रोडवरील अतिक्रमणे हटविली

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील प्रमुख महामार्गांच्या हद्दीत झालेल्या अतिक्रमणां विरोधात प्रशासनाने सोमवारी धडक मोहीम राबवित अतिक्रमणधारकांना दणका दिला. जालनावाटूर राष्ट्रीय महामार्गावरील विरेगाव, चितळपुतळी फाटा तसेच छत्रपती संभाजीनगरजालना रोडवरील बदनापूर व शेलगाव परिसरातील महामार्ग हद्दीतील अतिक्रमणे यंत्रसामग्रीच्या सहाय्याने हटविण्यात आली. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या या कारवाईमुळे दोन्ही मार्गांवरील महामार्गाची हद्द मोकळी करण्यात आली असून, वाहतूक अधिक सुरक्षित व सुरळीत होण्यास मदत होणार आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांच्या मार्गदर्शनाखाली ही व्यापक अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस प्रशासन आणि संबंधित टोलवेज यंत्रणांच्या समन्वयातून कारवाई करण्यात आली. महामार्गाच्या हद्दीत अतिक्रमण करून वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या बांधकामांवर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला.



जालनावाटूर राष्ट्रीय महामार्गावरील विरेगाव आणि चितळपुतळी फाटा परिसरात महामार्गाच्या हद्दीत करण्यात आलेली अतिक्रमणे हटविण्यात आली. या कारवाईत सार्वजनिक बांधकाम विभाग, मोजपुरी पोलीस ठाणे तसेच कल्याण टोलवेजचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

त्याचवेळी छत्रपती संभाजीनगरजालना रोडवरील बदनापूर आणि शेलगाव परिसरातही अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागतिक बँक प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंता प्रिया पुजारी, उपअभियंता राजेश डागुळे, कनिष्ठ अभियंता आरती राठोड आणि कनिष्ठ अभियंता श्रुती बिरारे यांच्यासह संबंधित अधिकारी-कर्मचारी या कारवाईत सहभागी झाले. बदनापूर व चंदनझिरा पोलीस ठाण्याचे अधिकारी-कर्मचारी तसेच छत्रपती संभाजीनगरजालना टोलवेजचे प्रकल्प प्रमुख यतींद्र कुमार पांडे, सुरक्षा प्रभारी विनायक सर्वज्ञ आणि संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनीही कारवाईत सहभाग घेतला. जिल्ह्यातील प्रमुख मार्गांवर दिवस-रात्र मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. अवजड वाहने, खासगी वाहने तसेच स्थानिक (पान २ वर)

## शेतकऱ्यांनी घाबरून जाऊ नये; शासन आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे

### आ.अर्जुनराव खोतकर यांच्याकडून दुष्काळी परिस्थितीची पाहणी

**जालना - प्रतिनिधी**

जालना विधानसभा मतदारसंघातील वडगाव, वखारी, बाजीउमरद, मौजपुरी, भिलपुरी, निरखेडा, आदी गावांना आज आमदार अर्जुनराव खोतकर यांनी भेट देऊन दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली. पावसाअभावी नुकसान झालेल्या कापूस, तूर, सोयाबीन, बाजरी, मूग आदी खरीप पिकांसह मोसंबी व द्राक्ष यांसारख्या फळपिकांचीही त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला.

यावेळी आ. अर्जुनराव खोतकर म्हणाले की, ''दुष्काळी परिस्थिती अत्यंत गंभीर असून शेतकरी, कामगार आणि शेतमजूर मोठ्या अडचणीत सापडले आहेत. जवळपास ७० ते ८० टक्के पिकांचे नुकसान झाले असून



उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर जनावरांच्या चारा व पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. पाणीटंचाईची तीव्रता आतापासूनच जाणवू लागली आहे. ते पुढे म्हणाले, ''या कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांनी घाबरून जाऊ नये. मी आपला प्रतिनिधी म्हणून शासन दरबारी शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न ठामपणे मांडणार आहे. शासनही शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर भरीव मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील. आपण सर्वांनी एकजुटीने या गंभीर परिस्थितीचा सामना करूया,'' असे आवाहन त्यांनी केले. यावेळी शिवसेना संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, माजी सभापती पांडुरंग डोंगरे, गणेश मोहिते, तालुकाप्रमुख भगवान अंभोरे, नागेश डवले, नरसिंह गोरे, वसंतराव राजे जाधव, चेअरमन रमेश जाधव, आप्पासाहेब (पान २ वर)

## मत्स्योदरी अभियांत्रिकी महाविद्यालयातील ९ विद्यार्थ्यांची औद्योगिक प्रशिक्षणासाठी निवड

**जालना - प्रतिनिधी**

शहरातील मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, जालना येथील विद्युत अभियांत्रिकी विभागातील ९ विद्यार्थ्यांची के.आय.एम.एल., पुणे आणि हायर अप्लायन्सेस, पुणे या नामांकित कंपन्यांमध्ये औद्योगिक प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना संबंधित कंपन्यांकडून ₹१७,७०० ते ₹२१,३०० पर्यंत मासिक शिष्यवृत्ती मिळणार आहे. या



प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच प्रत्यक्ष औद्योगिक क्षेत्राचा अनुभव मिळणार असून, त्यांच्या तांत्रिक ज्ञानाबरोबरच व्यावसायिक कौशल्यांचा विकास होण्यास मदत होणार आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. आरोग्य मंत्री श्री. राजेश टोपे साहेब, सचिव सौ. मनिषाताई टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड, सहायक प्रशासकीय अधिकारी श्री. राहुल भालेकर, प्राचार्य डॉ. एस.के. बिरादार, उपप्राचार्य प्रा.आर. एल. करवंदे, नियुक्ती व प्रशिक्षण अधिकारी श्री.कृष्णा ताठे तसेच विभागप्रमुख प्रा.चंद्रा रेड्डी, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाच्या नियुक्ती व प्रशिक्षण विभागामार्फत विद्यार्थ्यांना सातत्याने रोजगाराभिमुख प्रशिक्षण, कौशल्यविकास आणि नामांकित (पान २ वर)

## गोदावरी जल कलश यात्रेचा आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते शुभारंभ

**जालना । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सुमारे २५ वर्षांच्या यशस्वी सार्वजनिक जीवनाच्या निमित्ताने तसेच त्यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने महाराष्ट्रात सेवा पंधरवडा विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येत आहे. या सेवा पंधरवड्याच्या निमित्ताने भाजप अनुसूचित जाती-जमाती मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री सर्जेराव दादा जाधव यांच्या नेतृत्वाखाली गोदावरी जल कलश यात्रेचे आयोजन



करण्यात आले आहे. या यात्रेचा शुभारंभ भारतीय जनता पक्षाचे नेते, माजी मंत्री तथा परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते करण्यात आला. जालना शहरातील यशवंत नगर कॉलनी येथील श्री भक्ती निवास येथून या यात्रेला प्रारंभ झाला.गोदावरी नदीचे पवित्र जल कलशामध्ये घेऊन ही यात्रा विविध धार्मिक व ऐतिहासिक स्थळांमधून मार्गक्रमण करीत अयोध्या येथे पोहोचणार आहे. यात्रेचा मार्ग छत्रपती संभाजीनगर, धुळे, शेंदवा, इंदूर, उज्जैन, गोध्रा, अहमदाबाद, वडनगर, राजस्थान व मध्यप्रदेश मार्गे झांसी, प्रयागराज, वाराणसी असा असून त्यानंतर यात्रा अयोध्याधाम येथे पोहोचणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात झालेल्या विकासकामांचा व जनकल्याणकारी योजनांचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी सेवा पंधरवड्याच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन (पान २ वर)

## टेंभुर्णीत चोरट्यांची अजब चोरी; काही न मिळाल्याने शेतमजुरांचे जेवणाचे डबेच पळवले!

**दत्ता देशमुख**

दुष्काळाच्या झळा अजून तीव्र व्हायच्या आहेत, तोवरच परिसरामध्ये चोरटे सक्रिय झाल्याची धक्कादायक आणि तेवढीच क्लेशदायक घटना टेंभुर्णी येथे घडली आहे. येथील एका शेतात चोरांनी मौल्यवान वस्तू किंवा मुद्देमाल शोधण्याचा प्रयत्न केला; मात्र हाती काहीच न लागल्याने त्यांनी थेट रोजगारांचे (मजुरांचे) जेवणाचे डबेच पळवून नेले. या अजब चोरीमुळे परिसरात आश्चर्य व्यक्त होत असून, शेतकऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, टेंभुर्णी येथील गट नंबर ३२८ मध्ये सुखदेव खांडेभराड यांच्या शेतात सध्या सोयाबीन काढणी व मळणीचे (सोयाबीन सोडण्याचे) काम सुरू आहे. नेहमीप्रमाणे सकाळी मजूर शेतात कामासाठी आले होते. दिवसभराच्या कष्टाच्या कामातून दुपारच्या जेवणासाठी मजुरांनी आपले जेवणाचे डबे शेतातील एका बाजूला ठेवून दिले होते. मजूर कामात व्यस्त असताना, चोरट्यांनी शेतात डल्ला मारण्याचा प्रयत्न केला. आजूबाजूला मौल्यवान मुद्देमाल, पैसे किंवा अन्य वस्तू शोधण्याचा चोरट्यांनी बराच प्रयत्न केला. परंतु, संपूर्ण शेतात कुठेही असा मौल्यवान ऐवज त्यांना सापडला नाही. अखेर रिकाम्या हाताने परत जाण्याऐवजी चोरट्यांनी मजुरांच्या अन्नावरच डल्ला मारला आणि तिथे ठेवलेले जेवणाचे डबेच चोरून नेले.

दुपारच्या वेळी जेव्हा भुकेने व्याकुळ झालेले मजूर जेवण्यासाठी एकत्र आले, तेव्हा त्यांना आपले डबे गायब असल्याचे समजले. आजूबाजूला शोध घेऊनही डबे न सापडल्याने चोरांनीच ते पळवल्याचे स्पष्ट झाले. दिवसभर उन्हातानात कष्ट करणाऱ्या मजुरांच्या तोंडाचा घास अशा प्रकारे पळवला गेल्याने ही एक मोठी शोकांतिका मानली जात आहे. अजून कडक उन्हाळा किंवा तीव्र दुष्काळाची सुरुवात झालेली नसतानाही आत्तापासूनच चोरटे अशा प्रकारे सक्रिय झाल्याने शेतकरी आणि मजुरांमध्ये भीतीचे वातावरण आहे. शेतातील कृषी पंप, केबल, शेतीचे साहित्य चोरीला जाण्याच्या घटना नेहमीच ऐकायला मिळतात, मात्र आता मजुरांचे जेवणाचे डबेही सुरक्षित राहिले नसल्याने चिंता व्यक्त होत आहे. तरी पोलीस प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन परिसरात गस्त वाढवावी आणि चोरट्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा, अशी आर्त मागणी स्थानिक शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

**रात्रंदिवस राबून जगाचा पोशिंदा म्हणवून घेणारा आम्ही शेतकरी आज स्वतःच्याच शेतात हतबल झालोय. पोलीस प्रशासनाने तरी आमची व्यथा समजून घ्यावी. चोरांचा बंदोबस्त करावा, एवढीच एक आर्त हाक आहे. आम्ही कोणाकडे हात पसरत नाही, फक्त आमच्या कष्टाची भाकरी आम्हाला सुखाने खाऊ द्या, एवढीच इच्छा आहे!**

**- सुखदेव खांडेभराड**
**शेतकरी**

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी नमो व पी.एम. किसान सन्मान योजना पेन्शन मध्ये वाढ करा

### भाजपा जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बाबासाहेब कोलते यांची मागणी

**जालना - प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या नमो किसान सन्मान योजनेमध्ये केंद्र सरकार च्या पी.एम. किसान सन्मान योजनेमध्ये वाढ करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी भाजपा जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बाबासाहेब कोलते यांनी केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान व मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

केंद्रीय कृषी मंत्री व मुख्यमंत्री यांना पाठविलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी महाराष्ट्रातील व भारत देशातील



सर्व शेतकरी बांधवांसाठी पंतप्रधान किसान सन्मान योजना हि अल्पधारक शेतकऱ्यांसाठी सुरु केली असून देशातील प्रत्येक शेतकऱ्यांना एका वर्षात ६०००/- रुपये म्हणजे प्रत्येकी चार महिन्याला रुपये २०००/- चा हप्ता केंद्र शासनाकडून दिला जातो. केंद्र शासनाच्या धरतीवरच महाराष्ट्र राज्यातील अन्नदाता बळीराजाच्या उत्तपन्न वाढीसाठी नमो शेतकरी महासन्माननिधी योजना तत्कालीन भाजपा शिवसेना महायुतीचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरु केली होती. परंतु राज्य सरकारने सदर नमो शेतकरी महासन्मान योजनेतील आतापर्यंत ८ हप्ते शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग झाले आहे. सद्या महाराष्ट्रामध्ये दुष्काळग्रस्त परिस्थिती असल्यामुळे शेतकऱ्यांना (पान २ वर)

# दुष्काळी परिस्थिती आणि आर्थिक कोंडीत सरकार ट्रॅप तर प्रत्येक हालचालीत जनता ट्रॅक

केंद्र आणि राज्य सरकार सुरक्षा, पारदर्शकता आणि कर आकारणी अधिक मजबूत करण्यासाठी वेगवेगळ्या स्तरांवर विविध महत्त्वाच्या गोष्टींवर हायटेक आणि रिअल-टाइम मॉनिटरिंग म्हणजेच थेट देखरेख ठेवण्यास सुरुवात करणार आहे. महाराष्ट्र सरकार दुष्काळ आणि आर्थिक संकटामुळे लाडकी बहीण योजनेसह एकूण २६ प्रमुख लोककल्याणकारी योजना आणि २५ शासकीय धोरणांवर महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष (महा-टॅक) द्वारे भारतीय व्यवस्थापन शिक्षण संस्था मुंबई (आयआयएम मुंबई) च्या सहकार्याने रिअल-टाईम मॉनिटरिंग म्हणजेच थेट देखरेख करणार आहे. याशिवाय, माहिती आणि जनसंपर्क संचालनालय (डीआयपीआर) अंतर्गत प्रसारमाध्यमं, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडियावरील सर्व प्रकारच्या सकारात्मक व नकारात्मक बातम्यांचे अवलोकन करण्यासाठी राज्य सरकारने स्वतंत्र मीडिया मॉनिटरिंग सेंटरची स्थापना केली आहे. ज्याद्वारे सरकारविरोधी किंवा शासनाशी संबंधित बातम्यांवर सतत नजर ठेवली जाते. सांगायचे तात्पर्य म्हणजे सध्या सरकारचा मुख्य भर हा सरकारी योजनांचा खर्च, दुष्काळी उपाययोजना आणि सोशल मीडियावरील बातम्या ट्रॅक करण्यावर आहे.

२६ प्रमुख लोककल्याणकारी योजना आणि २५ शासकीय धोरणांवर प्रत्यक्ष नजर ठेवून १.२० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीच्या खर्चाचा मागोवा घेतला जाणार आहे. आयकर विभागाकडून बँक खात्यांमधील मोठ्या रोख (कॅश) व्यवहारांवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार असल्याने वर्षाला १० लाख रुपयांपेक्षा जास्त कॅश डिपॉझिट किंवा विथड्रॉवल झाल्यास सरकारकडून नोटीस येण्याची शक्यता आहे. ५,००० रुपयांपेक्षा जास्त मूल्याचे सर्व डिजिटल व्यवहार आणि युपीआय ट्रान्झॅक्शन्सच्या रेकॉर्डवर सरकार लक्ष ठेवल्याने डिजिटल पेमेंट ट्रॅक होणार आहे. सुरक्षितता आणि संशयास्पद खातीच्या दृष्टीकोनातून करचुकवेगिरी किंवा संशयास्पद उत्पन्न आढळल्यास अधिकृत अधिका-यांना बँक खाती, ईमेल आणि क्लाउड स्टोरेज तपासण्याची परवानगी देण्यात येणार आहे.

प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल मीडियामधील बातम्यांवर लक्ष ठेवण्यासाठी १० कोटी रुपये खर्चून मीडिया मॉनिटरिंग सेंटर स्थापन केले आहे. ज्याद्वारे सरकारविरोधातील नकारात्मक बातम्या आणि चुकीच्या माहितीवर (फेक न्यूज) लक्ष ठेवले जाणार आहे. गृह मंत्रालयाने (एमएचए) सायबर गुन्हेगारी आणि बेकायदेशीर कंटेंट रोखण्यासाठी फेसबुक, इंस्टाग्राम आणि युट्युब यांसारख्या प्लॅटफॉर्मवरील लाखो संशयास्पद लिंक्स आणि खात्यांवर मॉनिटरिंग वाढवून ते ब्लॉक करण्याचे आदेश दिले जाणार आहेत. पब्लिक ट्रान्सपोर्ट ट्रॅकिंग करण्याकरीता सार्वजनिक बसेस, टॅक्सी आणि इतर प्रवासी वाहनांमध्ये व्हीकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाईस आणि पॅनिक बटन अनिवार्य करण्यावर सरकार विचार करत आहे. पॅनिक बटन दाबल्यास थेट राज्य सरकारच्या मॉनिटरिंग सेंटरला अलर्ट मिळतो. तसेच दिल्ली सरकारने प्रदूषणाचे स्रोत शोधण्यासाठी २४ तास चालणारे एआय-पावर्ड इंटीग्रेटेड कमांड कंट्रोल सेंटर सुरू करत आहे. ज्याद्वारे कचरा जाळणे, बांधकामाची धूळ आणि रिअल-टाइम एअर क्वालिटी वर थेट नजर ठेवली जाणार आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील २६ योजना आणि २५ धोरणांचा फेरआढावा घेतला जाणार आहे. १.२० लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या योजनांच्या अंमलबजावणीवर रिअल-टाइम मॉनिटरिंग केले जाणार आहे. महाराष्ट्रातील महिलांसाठी महत्त्वाची योजना असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकडे सध्या विशेष लक्ष लागले आहे. राज्यात दुष्काळ आणि पाणी-चारा टंचाईची परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर सरकारसमोर एकीकडे शेतकरी आणि ग्रामीण भागासाठी मदतीची गरज आहे, तर दुसरीकडे मोठ्या खर्चाच्या योजनांचे आर्थिक नियोजन करण्याचे आवाहन आहे. याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या २६ योजना आणि २५ धोरणांचा फेरआढावा घेतला जाणार आहे. या योजनांवर १.२० लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाचा आवाका असल्याचे सांगितले जात आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र महिलांना आर्थिक मदत दिली जाते. त्यामुळे या योजनेसाठी राज्याच्या अर्थसंकल्पातून मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद करावी लागते. आता दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकरी आणि ग्रामीण भागासाठी अतिरिक्त मदतीची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेसह मोठ्या खर्चाच्या योजनांचे आर्थिक नियोजन पुन्हा चर्चेत आले आहे. दुष्काळामुळे सरकारसमोर दुहेरी आवाहन असल्याने आणि २६ योजना नि २५ धोरणांचा फेरआढावा घेतला जाणार असल्याने लाडकी बहीण योजना बंद होणार का? लाडकी बहीण योजनेचा फेरआढावा घेतला जाणार का? दुष्काळामुळे लाडकी बहीण योजनेवर परिणाम होणार का? २६ योजनांचा फेरआढावा का घेतला जात आहे? यासारखी अनेक प्रश्न उपस्थित होत आहे. योजनांची अंमलबजावणी, खर्च आणि प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोच यांचे अधिक प्रभावी मॉनिटरिंग करण्यासाठी सरकारकडून राबवण्यात येणा-या २६ योजना आणि २५ धोरणांच्या अंमलबजावणीचा फेरआढावा घेतला जाणार आहे. या योजनांचा निधी योग्य पद्धतीने वापरला जात आहे का? योजना अपेक्षित परिणाम देत आहेत का? आणि त्याचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतो का? यावर लक्ष दिले जाणार आहे. यासाठी महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष अर्थात महा-टॅक च्या माध्यमातून रिअल-टाइम मॉनिटरिंग व्यवस्था वापरण्यात येत आहे. सध्या लाडकी बहीण योजना बंद करण्याचा अधिकृत निर्णय झाल्याचे यातून दिसत नाही. २६ योजना आणि २५ धोरणांचा फेरआढावा घेण्याचा अर्थ संबंधित योजना तातडीने बंद केल्या जातील किंवा त्यांचे पैसे थांबवले जातील, असा थेट निष्कर्ष काढता येत नाही. दुष्काळामुळे राज्याच्या आर्थिक नियोजनावर अतिरिक्त दबाव येऊ शकतो. मात्र योजनेच्या लाभांवर बदल होणार कि नाही हे निश्चित सांगता येत नाही. फेरआढाव्यात योजनांचा खर्च, अंमलबजावणी आणि लाभार्थ्यांपर्यंत पोहोच यांचा आढावा घेतला जाणार आहे. मराठवाडा आणि विदर्भातील पाणी व चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर शेतक-यांसाठी मदतीची मागणी वाढत आहे. अशा परिस्थितीत सरकारला दुष्काळग्रस्त भागासाठी उपाययोजना करण्यासोबतच विविध कल्याणकारी योजनांसाठी निधीचे नियोजन करावे लागणार आहे. त्यामुळे पुढील काळात लाडकी बहीण योजनेसह मोठ्या आर्थिक आवाक्याच्या योजनांबाबत सरकार कोणते निर्णय घेते, याकडे महिलांसह सर्वांचे लक्ष राहणार आहे. महाराष्ट्रात ऐन दुष्काळी परिस्थितीमुळे आणि ढासळत्या आर्थिक समीकरणांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकार ॲक्शन मोडवर आले आहे.

महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष (महा-टॅक) स्थापन करण्याची गरज सरकारला का भासली? राज्याची आर्थिक स्थिती नेमकी कशी आहे? अर्थसंकल्प सादर करताना ४०,५५२ कोटींची महसुली तूट आणि १.५ लाख कोटींची राजकोषीय तूट अपेक्षित धरण्यात आली होती. त्यातच नव्या आर्थिक वर्षाच्या पहिल्याच तिमाहीत राज्य सरकारने तब्बल ९७ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. आधीच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, शेतक-यांना मोफत वीज आणि आता कर्जमाफी... यामुळे राज्यावरील कर्जाचा बोजा तब्बल ११ लाख कोटींवर गेला. केवळ कर्जाचं व्याज फेडण्यासाठी यावर्षी ७० हजार कोटींचा विक्रमी खर्च होणार आहे. अशा बिकट आर्थिक परिस्थितीत दुष्काळी उपाययोजना करण्यासाठी सरकारला आणखी कर्ज काढण्याशिवाय पर्याय नाही. याच पार्श्वभूमीवर १.२० लाख कोटींपेक्षा जास्त खर्चाच्या योजनांचं थेट मूल्यमापन करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. मात्र, महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष (महा-टॅक) द्वारे कोणत्या योजनेचं आणि धोरणांचे मूल्यमापन होणार? आणि कसे होणार?

उद्योग, आयटी, इलेक्ट्रिक वाहन, ग्रीन हायड्रोजन, पर्यटन, गृहनिर्माण आणि महिला धोरण यासह २५ प्रमुख धोरणांचे, १.२० लाख कोटींच्या २६ प्रमुख योजनांचे दर तिमाही समांतर मूल्यमापन होणार...योजनांचा लाभ वेळेत आणि योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचतो का? खर्चाची गुणवत्ता आणि निरुपयोगी मालमत्ता यांचा आढावा, विविध विभागांमधील भ्रष्टाचाराचे छुपे मार्ग शोधून ते बंद करण्यासाठी ठोस निर्णय, मुख्यमंत्री कार्यालयाला थेट लाईव्ह डॅशबोर्ड आणि तिमाही अहवाल सादर करणं बंधनकारक असणार आहे. एकीकडे दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी अडचणीत आहेत, तर दुसरीकडे तिजोरीवर ११ लाख कोटींचा डोंगराएवढा कर्जाचा भार राज्यावर आहे.

मात्र मुख्यमंत्र्यांचे थेट या खर्चिक योजनांवर लक्ष असल्याने प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. अशा स्थितीत १.२० लाख कोटींच्या योजनांचा महा-टॅक द्वारे घेतला जाणारा हा फेरआढावा सरकारी पैशांची उधळपट्टी थांबवेल की लाडकी बहीण सारख्या लोकप्रिय योजनांना कात्री लावेल याची उत्सुकता आहे.

**सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७४९८८८५०६१**

## लोकप्रिय बॉलीवूड अभिनेते मुकेश त्यागी आणि भाजपचे प्रवक्ते, विशेष अतिथी औशिम खेत्रपाल यांनी हनुमान अंशच्या टीमचा सन्मान

लोकप्रिय अभिनेते आणि भाजपचे प्रवक्ते मुकेश त्यागी यांनी कलाकार आणि तंत्रज्ञांसोबत विशेष अतिथी म्हणून हनुमान अंश चित्रपटाला हजेरी लावली आणि आपले विचार मांडले. विशेष म्हणजे, त्यांनी यावर्षी आपला वाढदिवस नैनिताल जिल्ह्यातील नीम करोली बाबा कैंची धाम येथे साजरा केला. मुकेश त्यागी हे बाबांच्या शिकवणी आणि चमत्कारांनी वैयक्तिकरित्या खूप प्रभावित आहेत. ज्युलिएट रॉबर्ट्स, स्टीव्ह जॉब्स, विराट कोहली आणि अनु शर्मा यांसारख्या आंतरराष्ट्रीय कलाकारांसह अनेक जण या स्थळाला नियमितपणे भेट देत असतात. हनुमानाच्या कृपेने हे ठिकाण खूप ऊर्जावान झाले आहे, असे ते म्हणाले. मुकेश म्हणाले की हनुमान अंश हा एक खूप प्रभावी चित्रपट आहे आणि त्यांनी सर्वांना आवाहन केले की त्यांनी हा चित्रपट आपल्या कुटुंबासोबत पाहावा आणि त्यातील आध्यात्मिक मूल्यांना आपल्या जीवनात आचरणात आणावे. त्यांनी श्रीश विजय गोयल आणि श्रीमंत व श्रम खेत्रपाल यांचे निमंत्रणाबद्दल मनःपूर्वक आभार मानले. शिर्डी साई बाबाचे निर्माते, शिर्डी साई बाबा फाउंडेशनचे संस्थापक व व्यवस्थापकीय विश्वस्त आणि साई बाबा शांती पुरस्कारांचे संस्थापक श्री. औशिम खेत्रपाल यांनी नवी दिल्लीतील गांधी स्मृती येथे आयोजित एका विशेष समारंभात हनुमान अंश चित्रपटातील कलाकार, निर्माते आणि दिग्दर्शकांना सन्मानपत्र देऊन सन्मानित केले. शिर्डी साई बाबा फाउंडेशनने गांधी स्मृती आणि दर्शन समितीच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या समारंभात, अध्यात्म, भक्ती आणि भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा यांना प्रोत्साहन देण्यात सिनेमाच्या भूमिकेचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला गांधी स्मृती आणि दर्शन समितीचे मानद उपाध्यक्ष श्री. विजय गोयल, शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्री. भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, शिर्डी साई बाबा फाउंडेशनचे संस्थापक श्री. औशिम खेत्रपाल आणि साई बाबा शांती पुरस्कारांच्या आंतरराष्ट्रीय रणनीतीकार संजना जॉन उपस्थित होत्या. या सोहळ्याला दिग्दर्शक विशाल चतुर्वेदी, मुख्य अभिनेता शोभिनव सत्या, तरुण अभिनेता विहान शेगडे (ज्याने वयाच्या १४ व्या वर्षी बाबांची भूमिका साकारली होती) आणि निर्मात्या नम्रता व रागिणी सोना यांच्यासह हनुमान अंशची संपूर्ण टीम उपस्थित होती. याप्रसंगी बोलताना श्री. औशिम खेत्रपाल म्हणाले, ''सव्वीस वर्षांपूर्वी, शिर्डी साई बाबांच्या संदेशाबद्दल आणि लोककल्याणाच्या त्यांच्या दूरदृष्टीबद्दल जागरूकता पसरवण्याच्या उद्देशाने आम्ही त्यांच्या जीवनावर आधारित शिर्डी साई बाबा हा चित्रपट बनवला होता. आज मला हे पाहून आनंद होत आहे की हनुमान अंशच्या निर्मात्यांनी आणि टीमने सुद्धा लोकांमध्ये आध्यात्मिक आणि धार्मिक जाणीव जागृत करणारा चित्रपट तयार केला आहे. हनुमान अंशच्या संपूर्ण टीमला सन्मानपत्र देऊन गौरवणे हा माझ्यासाठी एक अत्यंत आध्यात्मिक अनुभव आहे. सिनेमा हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नाही; ते आपल्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारशाबद्दल जागरूकता निर्माण करण्यातही महत्त्वाची भूमिका बजावू शकते.'' श्री. औशिम खेत्रपाल यांनी टीमचे अभिनंदन करून आणि चित्रपटाला शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची सांगता केली.

## दुष्काळात ऊस उत्पादकांना मोठा दिलासा: बागेश्वरी साखर कारखान्याचा गळीत हंगाम लवकर सुरु होणार; १२ ऑक्टोबरला शुभारंभ

''पाण्याच्या अभावाने ऊस वाळण्याच्या भीतीने प्रशासनाचा निर्णय; १२ ऑक्टोबरला बॉयलर प्रदीपन व गव्हाणीत मोळी टाकून हंगामाचा श्रीगणेशा''

**परतूर - माणिक जैस्वाल**



यंदा पावसाने पाठ फिरवल्यामुळे तालुक्यात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पाण्याचा तुटवडा आणि कडक उन्हाच्या झाळांमुळे ऊस पीक वाचवणे शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. पाण्याच्या अभावाने शेतातील ऊस वाळून जाण्याची भीती निर्माण झाल्याने, उपलब्ध उसाचे वेळेत गाळप होणे अत्यंत आवश्यक झाले आहे. हीच गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन बागेश्वरी साखर कारखान्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

कारखान्याचा यंदाचा गळीत हंगाम नेहमीपेक्षा लवकर सुरू केला जाणार असून, येत्या १२ ऑक्टोबर रोजी गव्हाणीत मोळी टाकून हंगामाचा औपचारिक श्रीगणेशा केला जाणार आहे. कारखान्याचे चेअरमन शिवाजीराव जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ ऑक्टोबर रोजी सकाळी विधिवत पूजा करून बॉयलर प्रदीपन करण्यात येईल. त्यानंतर गव्हाणीत मोळी टाकून गळीत हंगाम २०२६-२७ चा शुभारंभ होणार आहे. दुष्काळाच्या या कठीण काळात ऊस उत्पादकांची चिंता दूर करण्यासाठी कारखान्याने घेतलेल्या या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत आहे. कारखान्याच्या या भूमिकेमुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे. वेळेवर गाळप सुरू झाल्याने उसाचे होणारे नुकसान टळणार असून शेतकऱ्यांची चिंता काही प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे.

## ऐतिहासिक हडपक्या गणरायाचे दर्शन करतांना श्रीमंत राजे मुधोजी भोसले व स्वतंत्र पत्रकार रमेश लांजेवार



महाराष्ट्राची उपराजधानी व भौगोलिक दृष्ट्या भारताचा केंद्रबिंदू असलेल्या नागपूरमध्ये आजही २३९ वर्षांची वैभवशाली संस्कृतीची ओळख भोसले राजघराण्याच्या वतीने पारंपारिक ऐतिहासिक परंपरा जपण्याचे काम भोसले राजघराणे महाराजा ऑफ नागपूर ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष श्रीमंत राजे मुधोजी महाराज भोसले यांच्या वतीने होत आहे. त्यामुळेच आज आपल्याला भारतीय संस्कृती व परंपरागत संस्कृतीने दिलेला हडपक्या गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा होतांना दिसतो आणि ही परंपरा हडपक्या गणपती उत्सवाच्या निमित्ताने संस्कृतीला जपण्याची शिकवण सुध्दा युवा पिढीला प्रेरणादायी ठरणारी आहे.हा ऐतिहासिक हडपक्या गणेशोत्सव तब्बल दहा दिवस चालतो.या अनुषंगाने मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक कार्यक्रम होतात.त्याचप्रमाणे ऐतिहासिक वारसा पहाण्यासाठी राज्यातील अनेक मान्यवर व भक्तगण सिनियर भोंसला पॅलेस महाल नागपूर येथे हडपक्या गणरायाचे दर्शन घेण्यासाठी येत असतात आणि वैभवशाली संस्कृतीचे दर्शन सर्वांना होत असते.याप्रसंगी महाराजा ऑफ नागपूर ट्रस्ट हडपक्या गणेशोत्सवाला सदिच्छा भेट देऊन दर्शन घेतले व सर्वत्र सुख-शांती नांदावी, दुष्काळाचे सावट दूर व्हावे आणि निसर्ग प्रफुल्लित रहावा अशी गणरायाच्या चरणी प्रार्थना केली.

यावेळी महाराजा ऑफ नागपूर ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष श्रीमंत राजे मुधोजी भोसले, स्वतंत्र पत्रकार रमेश लांजेवार व अनेक मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांवरील ताण कमी करा; PAT चाचणी नोव्हेंबर ऐवजी शाळांच्या प्रथम सत्र परीक्षेत ऑक्टोबरअखेरच घ्या!

### शेख अब्दुल रहीम यांचे शालेय शिक्षणमंत्र्यांना साकडे...

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

राज्यातील इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रस्तावित 'नियतकालिक मूल्यांकन चाचणी' ( - संकलित मूल्यमापन चाचणी-१) नोव्हेंबरऐवजी ऑक्टोबरअखेर शाळांच्या प्रथम सत्र परीक्षेसोबतच घेण्यात यावी, अशी आग्रही मागणी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेचे राज्य प्रवक्ते तथा 'हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन'चे माजी अध्यक्ष अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुंबईत राज्याचे मुख्यमंत्री, शालेय शिक्षणमंत्री यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. शिक्षण आयुक्त तसेच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (, पुणे) यांच्याकडे ईमेलद्वारे सविस्तर निवेदन पाठवून तात्काळ सुधारित वेळापत्रक जाहीर करण्याचे आवाहन केले आहे.

दरवर्षी दिवाळीच्या सुट्टीपूर्वी ऑक्टोबरअखेर शाळास्तरावर प्रथम सत्र परीक्षा पार पडतात. मात्र, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने चाचणी नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात प्रस्तावित केल्यामुळे विद्यार्थ्यांवर पाठोपाठ दोन परीक्षांचा विनाकारण मानसिक ताण येईल, याकडे निवेदनात लक्ष वेधण्यात आले आहे.

**निवेदनातील ठळक मुद्दे:**



- बालमानसशास्त्राचा विचार: दिवाळीच्या प्रदीर्घ सुट्टीनंतर लगेच राज्यस्तरीय चाचणीचा बोजा विद्यार्थ्यांवर टाकणे अयोग्य असून, यामुळे तणावमुक्त शिक्षणाचा मूळ हेतू धोक्यात येतो.

- अध्यापनाचा वेळ वाचावा: अवघ्या काही आठवड्यांच्या अंतराने दोनदा परीक्षा घेतल्यास शाळांमध्ये दीर्घकाळ परीक्षांचेच वातावरण राहील आणि प्रत्यक्ष अध्यापनाचा बहुमूल्य वेळ वाया जाईल.

- वस्तुनिष्ठ मूल्यमापन: प्रथम सत्राचा अभ्यासक्रम ऑक्टोबरमध्ये पूर्ण होत असल्याने विद्यार्थ्यांच्या स्मरणात अभ्यास ताजा असतो; त्यामुळे ही चाचणी दिवाळीपूर्वीच घेणे अधिक संयुक्तिक ठरेल.

- परीक्षांचे सुसूत्रीकरण: शाळास्तरीय प्रथम सत्र परीक्षा आणि चाचणी यांचे ऑक्टोबरमध्येच योग्य सुसूत्रीकरण केल्यास प्रशासकीय सुलभता येईल तसेच निकालाला विलंब होणार नाही.

विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य आणि शैक्षणिक हित लक्षात घेता परीक्षांची दुहेरी पद्धत टाळणे गरजेचे आहे. नोव्हेंबरमधील चाचणीमुळे प्रथम सत्राचा निकालही लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. या सर्व बाबींवर सहानुभूतीपूर्वक विचार करून राज्य शासनाने संकलित मूल्यमापन चाचणी-१ ही ऑक्टोबर २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात घेण्याबाबत तात्काळ सुधारित परिपत्रक जारी करावे, अशी मागणी शेख अब्दुल रहीम यांनी केली आहे...

''दिवाळीच्या सुट्टीनंतर नोव्हेंबरमध्ये चाचणी घेऊन विद्यार्थ्यांवर दुहेरी परीक्षेचा मानसिक ताण लादणे पूर्णपणे अयोग्य आहे.

विद्यार्थ्यांचे हित आणि अध्यापनाचा वेळ वाचवण्यासाठी ही चाचणी ऑक्टोबरअखेर प्रथम सत्र परीक्षेसोबतच घेण्यात यावी, या मागणीसाठी आम्ही आज माननीय शालेय शिक्षणमंत्र्यांना भेटून निवेदन सादर केले आहे.''

**- शेख अब्दुल रहीम,**
**राज्य प्रवक्ता महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन**
**माजी अध्यक्ष: हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन**

# भाजपा जालना महानगरच्या वतीने भव्य 'विकसित भारत संकल्प सभा'

## जालन्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे - जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे

**जालना - प्रतिनिधी**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील जनसेवेच्या २५ वर्षपूर्तीनिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने देशभरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या 'सेवा संकल्प अभियाना' अंतर्गत भाजपा जालना महानगरच्या वतीने 'विकसित भारत संकल्प सभे'चे आयोजन बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ०९.०० वाजता वीर सावरकर चौक, जालना येथे करण्यात आले आहे. मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या राष्ट्रसेवेची २५ वर्षे हा देशाच्या सार्वजनिक जीवनातील महत्त्वपूर्ण टप्पा असून, या निमित्ताने जालना शहरात ही भव्य सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेला



पंतप्रधान नरेंद्रजी मोदी हे व्हर्च्युअल माध्यमातून संबोधित करणार आहेत. यावेळी विकसित भारताचा संकल्प, आत्मनिर्भर भारताची वाटचाल, केंद्र व राज्य शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजनांचा नागरिकांना मिळणारा लाभ, विकासकामे तसेच देशाच्या विकासासाठी सुरू असलेल्या विविध उपक्रमांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवतजी कराड हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास माजी केंद्रीय राज्यमंत्री मा. रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री आ. बबनरावजी लोणीकर, आ. नारायणजी कुचे, आ. संतोष पाटील दानवे, मा. आ. कैलासजी गोरंट्याल, मा. आ. विलास बापू खरात, प्रदेश सचिव मा. राहुल भैय्या लोणीकर तसेच मा. सतीश घाटगे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या २५ वर्षांत गरीब कल्याण, महिला सक्षमीकरण, युवकांसाठी संधी, शेतकरी कल्याण, पायाभूत सुविधा, आत्मनिर्भरता आणि विविध जनकल्याणकारी योजनांच्या माध्यमातून देशाच्या विकासाला चालना देण्यात आली आहे. या योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासोबतच 'विकसित भारताच्या संकल्पनेला अधिक बळ देण्याच्या उद्देशाने या सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

या सभेस भाजपा पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, विविध आघाड्या व मोर्चांचे पदाधिकारी, बूथप्रमुख, शक्तिकेंद्रप्रमुख तसेच जालना शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केले आहे.

# मंठा तालुक्यातील अंभोडा कदम येथे किशोरवयीन मुलींचा मेळावा उत्साहात

**जालना - प्रतिनिधी**




जिल्हा परिषद जालना यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' मंठा तालुक्यातील अंभोडा कदम येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा आणि आयुष्मान आरोग्य मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने किशोरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. किशोरवयीन मुलींच्या आरोग्यविषयक समस्या, योग्य आहार, वैयक्तिक स्वच्छता तसेच किशोरावस्थेतील शारीरिक व मानसिक बदल याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख मार्गदर्शिका प्रा. चारुलता पाटील, डॉ. नागरगोजे, डी.एम. अंभोडा कदम, आरोग्य सेविका शुभांगी रतन रोटे आणि प्रा. सरवदे यांनी किशोरवयीन मुलींना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थिनींनी विविध प्रश्न विचारून मार्गदर्शकांशी संवाद साधला. कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, इयत्ता पाचवी ते आठवीतील विद्यार्थिनी तसेच त्यांच्या माता मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी अंगणवाडी सेविका व मदतनीस, आशा सेविका, शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंद यांनी परिश्रम घेतले. किशोरवयीन मुलींच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणारा हा मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# अपर जिल्हादंडाधिकारी यांचे कलम ३७ (१) व (३) अन्वये आदेश जारी

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यात दि. ११ ऑक्टोबर रोजी घटस्थापना होणार असून दि. २० ऑक्टोबर २०२६ रोजी दसरा सण साजरा होणार आहे. नवरोत्सव सुरु झाल्याने मत्स्योदरी देवी संस्थान अंबड येथे यात्रा तसेच विविध ठिकाणी दांडीया उत्सव साजरा करण्यात येतो. तसेच राज्यातून विविध ठिकाणावरुन यात्रेसाठी पायी दिंड्या जालना जिल्ह्यातुन मार्गक्रमण करत आहेत. सण, उत्सव, जयंती यांनिमित्त जिल्ह्यात शहरात मिरवणुका व विविध कार्यक्रम आयोजित होतात. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक एकत्र येत असतात. तसेच सध्या महाराष्ट्रात व देशभरता आरक्षण उपवर्गीकरणाला तिव्र विरोध होत आहे. तसेच सध्या मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण व धनगर आरक्षण मिळावे या अनुषंगाने जालना जिल्ह्यात विविध आंदोलनात्मक कार्यक्रम सुरु आहेत. तसेच सध्या महाराष्ट्रात राजकीयदृष्ट्या सत्ताधारी व विरोधकात एकमेकांविरुध्द विविध कारणावरुन आरोप प्रत्यारोप सुरु आहे. तसेच शेतक-यांचे विविध *(पान २ वर)*

# वाणिज्य व नियोजन मंडळाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक दृष्टिकोन, आर्थिक साक्षरता - प्रा. डॉ. राहुलभाऊ म्हस्के यांचे प्रतिपादन

**दत्ता देशमुख**

सिल्लोड शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर संचलित **सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जाफ्राबाद** येथे वाणिज्य व अर्थशास्त्र विभागाच्या वतीने 'वाणिज्य व नियोजन मंडळ उद्घाटन समारंभ' उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिल्लोड शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगरचे सचिव मा. प्रा. डॉ. राहुल भाऊ म्हस्के* होते. कार्यक्रमाचे उद्घाटन *बँक ऑफ महाराष्ट्र, जाफ्राबाद शाखेचे शाखा व्यवस्थापक मा. श्री. विलास झारखंडे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख उपस्थितांमध्ये महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. मेढे एस. एल., उपप्राचार्य *प्रा. हिवराळे व्ही. टी.* तसेच वाणिज्य विभागप्रमुख प्रो. डॉ. बिरादार एम. बी. यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. यानंतर स्वागत समारंभ पार पडला.

यावेळी उद्घाटक मा. श्री. विलास झारखंडे यांनी विद्यार्थ्यांना वाणिज्य, बँकिंग, आर्थिक नियोजन, बचत, गुंतवणूक आणि बदलत्या आर्थिक क्षेत्रातील संधी* याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक ज्ञानासोबतच व्यावहारिक आर्थिक ज्ञान आत्मसात करून भविष्यातील करिअरच्या संधींचा लाभ घ्यावा, असे




त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात *मा. प्रा. डॉ. राहुलभाऊ जे. म्हस्के यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा अभ्यासमंडळांच्या उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करताना वाणिज्य व नियोजन मंडळाच्या या उद्घाटन कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक दृष्टिकोन, आर्थिक साक्षरता आणि नियोजन कौशल्य विकसित करण्यास निश्चितच मदत होणार आहे आणि अशा मंडळांमधून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबरोबरच प्रत्यक्ष जीवनातील आर्थिक व व्यावसायिक व्यवहारांचे ज्ञान मिळते, असे प्रतिपादन केले. वाणिज्य व नियोजन मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक, व्यावसायिक व मार्गदर्शनपर उपक्रमांची संधी मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. डॉ. मेढे एस. एल.* यांनी केले. कार्यक्रमाचे *सूत्रसंचालन प्रा. डॉ. पगारे एम. पी.* यांनी केले, तर *आभार प्रदर्शन प्रा. श्रीमती मणियार एस. आर. यांनी केले. या कार्यक्रमाप्रसंगी वाणिज्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी सुरेख भित्तिपत्रके तयार केली, त्यांचे उच्चाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# अखिल भारतीय माळी महासंघाच्या tebhurni शाखेच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा संपन्न



**दत्ता देशमुख**

जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथील अखिल भारतीय माळी महासंघाच्या ग्राम शाखेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा जाहीर सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. ग्राम शाखेच्या अध्यक्षपदी सोमनाथ ताबेकर, सचिवपदी प्रकाश मुळे तर सहसचिवपदी शिवाजी जमधडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यासाठी या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विठ्ठल माऊली पोरहीत, पत्रकार सुनिल भाले पवन पाचे भगवान घोडके प्रामुख्याने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित गौरव करण्यात आला.

# सेवा संकल्प अभियानांतर्गत चित्रकला स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**जालना - प्रतिनिधी**

शिक्षण विभाग जिल्हा परिषद जालना यांच्या वतीने सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. सेवा संकल्प अभियानांतर्गत प्राथमिक शाळा वडगाववाडी, जि.प.के.प्रा. शाळा कीर्ला, जि.प.प्रा. शाळा केदारवाकडी, जि.प.प्रा.शाळा वांजोळा आणि जि.प.प्रा. शाळा भुतेगाव येथे सेवा संकल्प अभियानांतर्गत चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेवर आधारित विविध विषयावरील चित्रे रेखाटून *(पान २ वर)*

# ग्रामीण कन्येची दमदार भरारी!

## कु. वैभवी फिरकेचे विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णयश

**दत्ता देशमुख**

अकोला : जिल्हा क्रीडा परिषद, अकोला व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १४ वर्षांखालील विभागीय शालेय बॉक्सिंग क्रीडा स्पर्धेत कु. वैभवी ज्ञानेश्वर फिरके हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावले. तिच्या या नेत्रदीपक यशामुळे ग्रामीण भागातील क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, सर्व स्तरांतून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. अभ्यासासोबतच क्रीडा क्षेत्रातही ग्रामीण भागातील मुली आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवू शकतात, हा प्रेरणादायी संदेश वैभवीने आपल्या यशातून दिला आहे. जिद्द, मेहनत, आत्मविश्वास आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर ग्रामीण कन्याही क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करू शकतात, याचे वैभवीचे यश हे ज्वलंत उदाहरण ठरले आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल श्री. सावता तिडके, श्री. विनायक खलसे, डॉ. मोठे साहेब, डॉ. अविनाश सुरूसे, श्री. धीरज काबरा,बालाजी डोमले राहुल डोमले



श्री. अलकेश सोमाणी, श्री. दत्ता वाघमारे, श्री. बी. टी. धनवाई सर तसेच वैभवीचे प्रशिक्षक श्री. सोफियान सर आदींनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. वैभवीच्या या सुवर्णकामगिरीने तिच्या कुटुंबासह शाळेचे, गावाचे आणि संपूर्ण ग्रामीण भागाचे नाव उज्ज्वल झाले असून, तिच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# जिल्हा स्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सेठ ई बी के उर्दु विद्यालयाने पटकावला द्वितीय व तृतीय क्रमांक

**दत्ता देशमुख**

शंभर शिक्षक क्लब जालना यांच्या वतीने महात्मा ज्योतीराव फुले यांच्या दोनशे व्या जयंती निमित्त आयोजित जिल्हा स्तरीय वक्तृत्व स्पर्धेत जाफराबाद तालुक्यातील टेंभूर्णी येथील सेठ ई बी के उर्दु विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. या जिल्हा स्तरीय वक्तृत्व स्पर्धेत मिस्बाह जावेद सिद्दिकी हिने द्वितीय क्रमांक पटकावला तर अलिना अमर पठाण हिने तृतीय क्रमांक संपादन करून उल्लेखनीय यश मिळविले.

दोन्ही विद्यार्थिनींच्या या यशामागे शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, परिश्रम आणि विद्यार्थिनींची मेहनत महत्त्वाची



ठरली. शिक्षक शेख साबेर यांनी विद्यार्थिनींना स्पर्धेसाठी विशेष मार्गदर्शन केले.

गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांमध्येही सेठ ई बी के उर्दु विद्यालयाचे विद्यार्थी सातत्याने उल्लेखनीय यश संपादन करीत असून, या यशामुळे शाळेच्या गुणवत्तापूर्ण वाटचालीत आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला आहे.

विद्यार्थिनींच्या यशामागे शाळेच्या मुख्याध्यापिका शेख सुमैया रोशन यांचे मार्गदर्शन, शिक्षकवृंदांचे प्रयत्न, पालकांचा पाठिंबा आणि ग्रामस्थांचे कौतुक मोलांचे ठरले आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष देवराव देशमुख, उपाध्यक्ष लक्ष्मण शिंदे, सचिव नंदलाल काबरा, कोषाध्यक्ष प्रेमसुख काबरा, संचालक प्रा. दत्तात्रेय देशमुख, ठमाजी भागवत शाळेतील मुख्याध्यापिका शेख सुमैया रोशन, मुख्याध्यापक शेख गयास, शिक्षकवृंद, पालक यांनी दोन्ही विद्यार्थिनींचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

# टेंभुर्णीच्या खालच्या बसस्थानकापर्यंत एसटी बससेवा सुरु करा; १५ दिवसांची मुदत

## ग्रामसभेच्या ठरावानंतर काँग्रेस कार्यकर्त्यांचे जाफराबाद आगाराला निवेदन; अन्यथा उपोषणाचा इशारा

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी गावातील खालच्या बस स्टँडपर्यंत पूर्वी सुरू असलेली एसटी बससेवा रस्त्यावर झालेल्या अतिक्रमणामुळे बंद झाली असून, त्यामुळे विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. या प्रश्नाची तातडीने दखल घेऊन खालच्या बस स्टँडपर्यंत एसटी बससेवा पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी करत जाफराबाद आगार व्यवस्थापकांना निवेदन देण्यात आले.

टेंभुर्णी येथे नुकत्याच झालेल्या ग्रामसभेमध्ये खालच्या बस स्टँडपर्यंत जाफराबाद आगाराची एसटी बससेवा सुरू करण्याबाबत अधिकृत ठराव मंजूर करण्यात आला आहे. या ग्रामसभा ठरावाची प्रत जोडून संबंधित निवेदन जाफराबाद आगार प्रशासनाला देण्यात आले.



रस्त्यावर झालेल्या अतिक्रमणामुळे बस वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याने संबंधित बांधकाम विभाग, रस्ता विभाग व स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधून रस्ता अतिक्रमणमुक्त करण्याची कार्यवाही करावी आणि त्यानंतर बससेवा पूर्ववत सुरू करावी, अशी ठाम मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी काँग्रेस कार्यकर्ता शुभम मुळे, टेंभुर्णी, काँग्रेस तालुकाध्यक्ष अजय बनकर, जाफराबाद शहराध्यक्ष मेहबूब पठाण, अभिषेक मोळवंडे, भरत अंभोरे, कार्याध्यक्ष पंकज पाटील लोखंडे, मोईज शेख आदी उपस्थित होते.

**१५ दिवसांची मुदत; अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन**

ग्रामसभेच्या ठरावानंतरही प्रशासनाकडून या प्रश्नाकडे दुर्लक्ष झाल्यास ग्रामस्थांच्या संयमाचा अंत होईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. निवेदनाची दखल घेऊन १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष कार्यवाही सुरू करून टेंभुर्णीच्या खालच्या बस स्टँडपर्यंत एसटी बससेवा पूर्ववत करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

१५ दिवसांत ठोस कार्यवाही न झाल्यास जाफराबाद आगारासमोर संविधानिक व लोकशाही पद्धतीने शांततापूर्ण उपोषण व आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. टेंभुर्णी हे मोठे गाव असून हजारो नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाचा प्रश्न असताना प्रशासनाने केवळ कागदी आश्वासनांवर न थांबता प्रत्यक्ष रस्ता पाहणी करून अतिक्रमणाचा प्रश्न सोडवावा आणि बससेवा सुरू करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

''ग्रामसभेचा ठराव झाला आहे, आता प्रशासनाने निर्णय घेण्याची वेळ आली आहे. १५ दिवसांत कार्यवाही झाली नाही तर लोकशाही मार्गाने आंदोलनाची भूमिका ठाम राहील,'' अशी भूमिका निवेदनकर्त्यांनी व्यक्त केली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.